<u>वादीतर्फे सा.क्र. १ सुखदेव शंकर जोर्वेकर यांचा पुढील सरतपास वादीतर्फे श्री.एस.बी.वाकडे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.</u>

१. सदर प्रकरणात मी दस्त यादी नि.क्र.७८ वर दोंडाबाई जोर्वेकर यांचा मृत्यूचा दाखला दाखल केला असून तो **नि.क्र.९२** वर आहे. तसेच सदर प्रकरणात मी लक्ष्मण जोर्वेकर, भिमसेन लक्ष्मण जोर्वेकर व सकूबाई लक्ष्मण जोर्वेकर यांची मृत्यू नोंद आढळून येत नसलेबाबतचे ग्रामपंचायतीचा दाखला दाखल केला असून ते अनुक्रमे **नि.क्र.९३,९४ व ९५** वर आहेत. तसेच सदर प्रकरणात मी सुखदेव शंकर जोर्वेकर हे भूमीहिन असलेबाबतचा कामगार तलाठी यांचा दाखला दाखल केला असून तो **नि.क्र.९६** वर आहे. तसेच सदर प्रकरणात मी तहसिलदार यांनी फेरफार नोंद क्र.२९२२ व ३१०१ संदर्भातील मुळ कागदपत्रे नसलेबाबतचे दिलेले पत्र दाखल केले असून ते **नि.क्र.९७** वर आहे. तसेच सदर प्रकरणात विकास जोर्वेकर यांनी कामगार तलाठी यांना दिलेला अर्ज व त्यावर कामगार तलाठी यांनी नोंदविलेला शेरा असलेला अर्ज मी दाखल केला असून त्यास **नि.क्र.९८** देण्यात येते. तसेच सदर प्रकरणात मी फेरफार क्र.२९५१ ची सत्यप्रत दाखल केली असून ती **नि.क्र.९९** वर आहे.

**सरतपास पुर्ण.**

<u>प्रतिवादी क्र.२ ते ६ व ८ तर्फे उलटतपास श्री.ए. व्ही. शिंदे यांच्यामार्फत सुरु–</u>

२. वादी क्र.२ सुमन जोर्वेकर माझी बहिण असून ती आज न्यायालयात उपस्थित आहे. तसेच राजू सुखदेव जोर्वेकर हा माझा मुलगा असून तो आज न्यायालयात उपस्थित आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या सातबारा उता-यावर प्रतिवादींची नावे आहेत. मी अशिक्षीत आहे व मला लिहीता वाचता येत नाही. तसेच मला सही देखील करता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात नमूद दावामिळकतीच्या चतुःसिमा दाव्यात नमुद करण्यात आलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींच्या कशा वाटण्या झाल्या आहेत हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीं माझ्या

पाहण्यातल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतींमध्ये विहीर असून त्या विहीरीचे पाणी पाईपलाईनने इतर दावा मिळकतींमध्ये नेण्यात आले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतींमध्ये एक आश्रम आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतींमध्ये प्रतिवादी घरे करुन राहतात व त्यामध्ये त्यांचे गाय, गाठे देखील आहेत. सदर दाव्यासोबत मी पत्ता यादी नि.क्र.४ सोबत माझे आधार कार्डची प्रमाणित प्रत दाखल केली असून ती खरी व बरोबर आहे. साक्षीदारास उलटतपासा दरम्यान त्याच्या आधार कार्डची प्रमाणित प्रत दाखविण्यात आल्यामुळे त्यास **नि.क्र.१००** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईचे नाव धोंडाबाई जोर्वेकर होते व ती दि.२३/०४/२००६ रोजी खिर्डी, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी येथे मयत झाली.

३. आमच्या कुटूंबाच्या मुळ पुरुषाचे नाव भिवा कुंभार होते. भिवाला शंकर व लक्ष्मण अशी दोन मुले होती. त्यातील शंकर हे माझे वडिल होते व लक्ष्मण हे माझे चुलते होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे चुलते लक्ष्मण यांना सकुबाई नावाची पत्नी होती व कचरु व भिमसेन अशी दोन अपत्ये होती. हे म्हणणे खरे आहे की, भिमसेन हा अविवाहीत असतानाच मयत झाला. माझे वडिल शंकर यांना धोंडाबाई पासून मी, रणजित, खंडू, मारुती व सूमन अशी अपत्ये झाली. हे मला माहित नाही की, माझे वडिल शंकर यांनी दि.२६/०४/१९६२ रोजी गट क्र.६९१ पैकी ७७ आर एवढी मिळकत म्हातारबा पाडेकर यांना विकली. हे मला माहित नाही की, म्हातारबा पाडेकर यांनी तीच मिळकत दि.१४/१२/१९६३ रोजी विश्राम जगन्नाथ चेत्तर यांना विकली.

**प्रश्न-** तुमचे वडिल व चुलते यांनी कोणत्या जमीनी कोणाला विकल्या याची तुम्हाला माहिती नाही ?

**उत्तर-** माझे वडिल व चुलते यांनी जमीनी विकलेल्या नाहीत.

४. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल व चुलते यांनी कोणत्याही जमीनी विकल्या नाहीत हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीं संदर्भांत प्रतिवादींच्या लाभात खरेदीखत झालेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी सदरचा दावा हा

खरेदीखत रद्दबातल होउन मिळणेकरीता केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, जे खरेदीचे दस्त रद्दबातल करुन मी मागितले आहेत, ते दस्त मी या प्रकरणात अभिलेखावर दाखल केले आहेत. मी सदर दाव्यात दस्त यादी नि.क्र.३ अन्वये अं.क्र.२३ वर महादू चत्तर, रंजक जोर्वेकर, सूका जोर्वेकर व खंडू जोर्वेकर यांच्यात झालेली इसार पावती दाखल केली असून ती मला मान्य आहे. वादीने सदर इसार पावती मान्य केल्यामुळे त्यास **नि.क्र.१०१** देण्यात येते.

**प्रश्न-** तुम्ही सदर दाव्यात दस्त यादी नि.क्र.३ अन्वये अं.क्र.२४ वर महादू चत्तर, विश्राम चत्तर, रंजक जोर्वेकर, सूका जोर्वेकर, मारुती व खंडू जोर्वेकर यांच्यात झालेले खरेदीखत दाखल केले असून ते खरेदीखत झाले आहे ?

**उत्तर-** ते खरेदीखत झाले आहे, परंतु ते मला मान्य नाही.

**प्रश्न-** तुम्ही सदर दाव्यात दस्त यादी नि.क्र.३ अन्वये अं.क्र.२५ वर गंगाधर महादू चत्तर व कचरु लक्ष्मण जोर्वेकर यांच्यात झालेले खरेदीखत दाखल केले असून ते खरेदीखत झाले आहे ?

**उत्तर-** ते खरेदीखत झाले आहे, परंतु ते मला मान्य नाही.

**प्रश्न-** तुम्ही सदर दाव्यात दस्त यादी नि.क्र.३ अन्वये अं.क्र.२६ वर गंगाधर महादू चत्तर व कचरु लक्ष्मण जोर्वेकर यांच्यात झालेले खरेदीखत दाखल केले असून ते खरेदीखत झाले आहे ?

**उत्तर-** ते खरेदीखत झाले आहे, परंतु ते मला मान्य नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतींमध्ये माझे वडिल शंकर व चुलते लक्ष्मण यांचा प्रत्येकी अर्धा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे चुलते लक्ष्मण यांनी दावा मिळकतींमधील त्यांचा अर्धा हिस्सा विकला असून त्याबाबत आमची कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, यापुर्वी आम्ही प्रतिवादी विरुध्द रे.मु.नं.२६५/१९७२ हा दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही यापुर्वी प्रतिवादी विरुध्द रे.मु.नं.२८४/१९७६ व रे.मु.नं.३७५/१९७६ हे दावे दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, रे.मु.नं.२६५/१९७२ या दाव्यात खंडू जोर्वेकर, सूमन गोपाळ आहेर व माझ्या करीता

अ.पा.क. म्हणून माझा भाउ खंडू जोर्वेकर यांची सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, रे.मु.नं.२८४/१९७६ व रे.मु.नं.३७५/१९७६ या दाव्यांवर माझी, माझा भाउ खंडू व बहिण सूमन यांची सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, रे.मु.नं.२६५/१९७२, रे.मु.नं.२८४/१९७६ व रे.मु.नं.३७५/१९७६ हे दावे दावामिळकती संदर्भांत झालेली खरेदीखते बेकायदेशिर आहेत असा ठराव पारीत करण्याकरीता दाखल करण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, रे.मु.नं.२६५/१९७२, रे.मु.नं.२८४/१९७६ व रे.मु.नं.३७५/१९७६ हे तिन्ही दावे न्यायालयाने निकाली काढले.

**न्यायालयीन कामकाजाची वेळ संपल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.**

सा.वा.दा.ब.अ.क.के.

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**सही/-**

**५ वे सहदिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**संगमनेर.**

**सही/-**

**५ वे सहदिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**संगमनेर.**

**दिनांक – ०७/०५/२०२५**

**<u>वादीतर्फे सा.क्र. १ सुखदेव शंकर जोर्वेकर यांचा उर्वरित उलटतपास प्रतिवादी क्र.२ ते ६ व ८ तर्फे श्री.ए. व्ही. शिंदे यांच्यामार्फत शपथेवर सुरु–</u>**

६. हे म्हणणे खरे आहे की, पूर्वीच्या दाव्यांची माहिती मी माझ्या दाव्यात नमूद केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पूर्वीच्या दाव्यांची माहिती या दाव्यात नमूद करणे आवश्यक होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा दावा मुदतीत आणण्याकरिता मी पूर्वीच्या दाव्यांची माहिती या दाव्यात लपवून ठेवलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, या दाव्यात व पूर्वीच्या दाव्यांमध्ये आमच्या कुटुंबातील सदस्यांची खोटी वय नमूद केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या ज्यादा पूराव्याकामी प्रतिज्ञालेखात माझे वय ६५ नमूद केले असून ते खोटे आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये आमच्या कुटुंबाचा ८ आणे हिस्सा व प्रतिवादी क्र. १ कचरु याचा ८ आणे हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील शंकरच्या कुटुंबाचा आणि माझे चुलते लक्ष्मण यांच्या कुटुंबाचा दावा मिळकतीमध्ये प्रत्येकी ८ आणे हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट स्कीम पूर्वीच माझे चुलते लक्ष्मण यांच्या नावावर दावा मिळकतीतील ८ आणे हिस्सा गेला होता व ८ आणे हिस्सा आमच्या कुटुंबाच्या नावे आला होता. हे म्हणणे खरे आहे की, गट स्कीमनंतर लक्ष्मण मयत झाल्यामुळे त्याच्या नावे आलेला दावा मिळकतीमधील ८ आणे हिस्सा हा त्याची मुले कचरु व भीमसेन यांच्या नावे झाला. हे मला माहित नाही की, भीमसेन मयत झाल्यानंतर लक्ष्मणचा संपूर्ण ८ आणे हिस्सा कचरुच्या नावे झाला.

७. हे म्हणणे खरे आहे की, कचरुने त्याच्या नावावरील ८ आणे हिस्सा प्रतिवादी क्र. २ ते ८ यांना विक्री केला असून त्याबाबत आमची कोणतीही तक्रार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कचरुने त्याच्या हयातीमध्ये प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्या लाभात करुन दिलेल्या खरेदीखता संदर्भात कोणतीही तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई धोंडाबाईने तिच्या हयातीमध्ये प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्या लाभात करुन दिलेल्या खरेदीखता संदर्भात कोणतीही तक्रार केलेली नाही. हे मला माहित नाही की, माझे वडील शंकर यांनी

त्यांच्या हयातीमध्ये प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्या लाभात करुन दिलेल्या खरेदीखतासंदर्भात कोणतीही तक्रार केलेली नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ खंडू मयत आहे. तो ५ ते ६ वर्षांपूर्वी मयत झाला. त्याचे लग्न झाले होते व त्याची पत्नी व मुले आज हयात आहेत. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यात खंडूची पत्नी व मुले यांना मी पक्षकार केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीत खंडूचा देखील हिस्सा आहे. सदर दाव्यात मी किती खरेदीखते बेकायदेशीर आहेत हा ठराव मागितला आहे, ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या खरेदीखतासंदर्भात मी ठराव मागितला आहे ती खरेदीखते किती होती, त्यातील मिळकतींचे क्षेत्र किती होते, ती खरेदीखते कधी करण्यात आली याबाबत मला काही माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या खरेदीखतांमध्ये मोबदला रक्कम किती घेण्यात आली व त्यात काय मजकूर लिहिला आहे, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या खरेदीखतांमध्ये खरेदी घेणार व खरेदी देणार कोण होते हे देखील मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यात कोणत्या मिळकती नमूद करण्यात आल्या आहे व त्याचे क्षेत्र किती आहे व त्या आजरोजी कोणाच्या ताब्यात आहेत, हे देखील मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यात मी दाखल केलेले दस्त हे माझ्या मुलाने वकिलांना दाखवले व माझ्या मुलाने सांगितल्याप्रमाणे वकिलांनी दावा तयार केला व मी त्यावर अंगठा केला. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात काय लिहिले आहे, हे देखील मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर दाव्यात दाखल केलेले दोन्ही पुरावाकामी प्रतिज्ञालेख निशाणी क्र. २९ व २९अ हे माझ्या वकिलांनी लिहिले असून त्यातील मजकूर मला माहित नाही व मी केवळ त्यावर अंगठा केला आहे.

९. हे म्हणणे खरे नाही की, सदर दाव्यातील वादातीत खरेदीखतांवर माझी आई धोंडाबाई, माझ्या वतीने माझ्या आईची व माझा भाऊ रंजक यांची सही/अंगठा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईने व भावाने प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्या लाभात जी खरेदीखते

करुन दिली ती माझ्यावर बंधनकारक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, कचरुने त्याच्या कौटुंबिक गरजेकरिता त्याच्या नावावरील मिळकत खरेदी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यात मी दावा मिळकतींच्या चतुःसीमा नमूद केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे दावा मिळकतीचे वर्णन अपुरे असल्यामुळे नेमक्या दावा मिळकती कोणत्या आहेत याचे आकलन होत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जुने दावे आम्ही गैरहजर राहिल्याने न्यायालयाने निकाली काढले. हे मला माहित नाही की, निकाली निघालेले जुने दावे पुन्हा पटलावर घेण्याकरिता आम्ही अर्ज केला होता अथवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सज्ञान झाल्यानंतर ३ वर्षांच्या आत सदर दाव्यातील वादातीत खरेदीखते रद्द करण्याकरिता मी न्यायालयात दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती ताब्यात मिळाल्यानंतर प्रतिवादी क्र. २ ते ८ यांनी त्या विकसित केल्या. आज रोजी दावा मिळकती प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्याकडे मालकी हक्काने कशा काय आल्या आहेत, ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी दावा मिळकती प्रतिवादी क्र. २ ते ८ च्या ताब्यात आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती माझी आई व भाऊ रंजक यांनी त्यांच्या कौटुंबिक गरजेकरिता योग्य मोबदला घेवून प्रतिवादी क्र. २ ते ८ यांच्या नावे केल्या. हे म्हणणे खरे आहे की, ज्या फेरफार नोंदी अन्वये प्रतिवादी क्र. २ ते ८ यांची नावे दावा मिळकतींना लागली त्या फेरफार नोंदी आम्ही आजपर्यंत आव्हानीत केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतींमधील तथाकथित घराचे वर्णन मी सदर दाव्यात दिलेले नाही.

१०. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दाव्यात मोबदला स्वीकारला नसल्याबाबत व दस्त लिहून दिला नसल्याबाबत केलेले कथन खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा दावा मिळकतीमध्ये १/२ हिस्सा कायम राहिला, हे माझे दाव्यातील कथन खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई व भाऊ अडाणी व अशिक्षित होते व त्यांनी मोबदला स्वीकारला नाही, हे माझ्या दाव्यातील कथन खोटे आहे. हे मला माहित नाही की, दिनांक ३/३/१९८४ व २३/७/१९८४ रोजी प्रतिवादींनी कचरु यास खरेदीदस्ता पोटी अनुक्रमे १०,०००/– व ७,०००/– रुपये मोबदला म्हणून दिले. हे म्हणणे खरे आहे की, कचरुने केलेल्या

व्यवहारांबाबत आम्हाला आजही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, कचरुने करुन दिलेल्या खरेदीखतांबाबत व माझ्या आई व भावाने करुन दिलेल्या खरेदीखतांबाबत आम्हाला डिसेंबर २०१९ मध्ये प्रथमतः माहिती झाली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. ७/११/२०२० रोजी आम्ही प्रतिवादींना पाठवलेली नोटीस बेकायदेशीर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या नोटीसला प्रतिवादींनी वकिलांमार्फत उत्तर पाठवले होते. साक्षीदारास उलटतपासादरम्यान त्याने दाखल केलेले नोटीसचे उत्तर दाखवण्यात आल्यामुळे व त्याने ते ओळखल्यामुळे त्यास **निशाणी क्र. १०२** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २ ते ८ हे दावा मिळकतींचे बोनाफाईड पर्चेसर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेला दावा व पुरावाकामी प्रतिज्ञालेखातील मजकूर संपूर्णपणे खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेल्या दाव्यातील मागण्या बेकायदेशीर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझा दावा मुदतीत दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही पूर्वी केलेले दावे मुदतीत होते. हे म्हणणे खरे नाही की, डिसेंबर २०१९ मध्ये दाव्यात कारण घडले, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**सा.वा.दा.ब.अ.क.के.** **श्रवणोत्तर स्वीकृती,**

**सही/-**
**५वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, संगमनेर.**
**दिनांक – २५/०६/२०२५**

**सही/-**
**५वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,**
**संगमनेर.**